# प्रस्तावना...



स्वच्छ भारत सुंदर भारत, अशी जनजागृती आपण करत आहोत. देशभरातील स्वच्छतेच्या समस्येला तोंड देण्यासाठी भारत सरकारने ही मोहिम राबविली आहे. ही मोहीम देशाच्या विकासाच्या दिशेने उचललेले एकमेव पाऊल आहे. कारण स्वच्छता आयुष्यात निरोगी, समृद्ध, यशस्वी होण्याचे दार उघडेल. या योजनेंतर्गत जसे की, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ग्रामीण भागातील स्वच्छतेच्या पातळीत सुधारणा करणे, गावे हागणदारीमुक्त करणे यासाठी ग्रामीण भागात वैयक्तीक शौचालये, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सामुदायिक स्वच्छतागृहे, शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालये, घन व द्रव्य कचरा व्यवस्थापन यांच्या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. याकरिता राज्य शासनाने घेतलेले धोरणात्मक निर्णय याचा पूर्ण संग्रहसूची ठेव यापूर्वी उपलब्ध नव्हता.

देशातील सर्वात लक्षणीय आणि लोकप्रिय अभियान राबवितांना तुम्हाला व सर्वांना या संग्रहाचा कामकाजामध्ये/अंमलबजावणी करतांना उपयोग व्हावा, याकरिता हा संग्रह तयार करण्यात आला आहे. हा संग्रह डिजिटल स्वरुपामध्ये देखील विभागाच्या संकेतस्थळावर लवकर प्रसिद्ध करण्यात येत आहे. परंतु ग्रामीण किंवा तालुकास्तरावर ते तत्परतेने उपलब्ध होण्याच्या दृष्टिने पुस्तकाच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. एकूणच ही संग्रह पुस्तिका आपणा सर्वांना एक उपयुक्त पुस्तक ठरेल; अशी मला खात्री आहे.

(संजीव जयस्वाल)
प्रधान सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई.



स्वच्छ भारत अभियान

भारत स्वच्छ

एक पाऊल स्वच्छतेकडे